आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१६ जुलै २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वस्तू आणि सेवा निर्यातीत ५ पूर्णांक ४ दशांश टक्के वाढ

- नव्या फौजदारी कायद्याअंतर्गत साक्षीदारांची चौकशी करण्यासाठी पोलीस ठाण्यातली किंवा पोलीस विभागाच्या अखत्यारीतली जागा निवडू नये असे केंद्रीय गृहमंत्रालयाचे सर्व राज्यसरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश

- जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात दहशतवाद्यांबरोबरच्या चकमकीत सुक्षा दलाचे ५ जवान शहीद

- परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर हे आजपासून दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर

**आणि**

- मुंबई-पुणे महामार्गावर बस अपघातात ७ जणांचा मृत्यू , ५ जण जखमी

**<><><><><><>**

देशाची वस्तू आणि सेवा निर्यात जून महिन्यात ५ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांनी वाढून ६५ अब्ज ४७ कोटी डॉलरवर पोहोचली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीत ही माहिती देण्यात आली. चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल ते जून या तिमाहीत निर्यात ८ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांनी वाढून २०० अब्ज ३३ कोटी डॉलरवर पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या जून महिन्याच्या तुलनेत या वर्षी जून महिन्यात व्यापारी निर्यातीत वाढ झाली. २०२४ च्या एप्रिल ते जून महिन्याच्या कालावधीत व्यापारी निर्यात १०९ अब्ज ९६ कोटी डॉलरवर

पोहोचली. २०२३ च्या एप्रिल ते जून महिन्यात ती १०३ अब्ज ८९ कोटी डॉलर इतकी होती. अभियांत्रिकी सामग्री, इलेक्ट्रॉनिक वस्तू, औषधं, कॉफी या वस्तूंची निर्यात वाढल्यामुळे देशाच्या निर्यातीत वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

संरक्षण क्षेत्रातली आयात कमी करून आत्मनिर्भरतेवर भर देण्याच्या उद्देशानं सरकारनं पाचवी सकारात्मक स्वदेशीकरण यादी प्रसिद्ध केली आहे. लाइन रिप्लेसमेंट युनिट्स, सुटे भाग, कच्चा माल अशा एकंदर ३४६ वस्तूंचा समावेश या यादीत आहे. याचं आयात मूल्य एक हजार कोटी रुपयांपेक्षाही जास्त आहे. या वस्तू फक्त भारतीय उत्पादकांकडूनच खरेदी केल्या जातील, अशी माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये १२ हजारापेक्षा जास्त वस्तू देशातच तयार करण्याच्या दृष्टीनं पावलं उचलण्यात आली आहेत. यामुळे स्थानिक उत्पादकांना ७ हजार ५०० कोटी रुपयांपेक्षाही जास्त व्यवसाय मिळाला आहे.

<><><><><>

गुन्ह्याचा तपास करताना साक्षीदारांची चौकशी करण्यासाठी पोलीस ठाण्यातली किंवा पोलीस विभागाच्या अखत्यारीतली जागा निवडू नये असं केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाचे सचिव अजय भल्ला यांनी या संदर्भात सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहलं आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कायद्या अंतर्गत सर्व पोलीस ठाण्यांनी साक्षीदाराची चौकशी ऑडिओ, व्हिडीओ इलेक्ट्रॉनिक साधनांच्या माध्यमातून करण्यासाठी विशिष्ट जागा ठरवून घ्यावी असं सरकारनं सांगितलं आहे.

**<><><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यात काल रात्री दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत गंभीर जखमी झालेल्या पाच सुरक्षादल जवानांचा आज मृत्यू झाला. यात लष्कराच्या एका अधिकाऱ्याचाही समावेश आहे. या भागात दहशतवाद्यांचा वावर असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर राष्ट्रीय रायफल्स आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या विशेष कार्य दलाच्या पथकांनी शोधमोहीम राबवली. यादरम्यान दहशतवाद्यांशी चकमक होऊन पाच जवान जखमी झाले होते. त्या पाचही जणांना आज वीरमरण आलं. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी याबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. कर्तव्य बजावत असताना प्राणांची आहुती देणाऱ्या या जवानांच्या कुटुंबीयांसोबत देश खंबीरपणे उभा आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनीही या हुतात्म्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><><>**

सरकारनं आजपासून सर्व विमानं आणि विमान इंजिनाच्या विविध सुट्या भागांवर पाच टक्के एकसमान एकात्मिक वस्तू आणि सेवा कर अर्थात आयजीएसटी लागू केला आहे. याआधी वेगवेगळ्या प्रकारासाठी हा दर पाच, बारा, अठरा ते २८ टक्क्यांपर्यंत आकारला जात असल्यानं तसंच तो वेगवेगळ्या खात्यांमध्ये जमा होत असल्यानं ही कररचना गुंतागुंतीची झाली होती. ती एकसमान दर लागू करून सुटसुटीत केली असल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत एक रुपयात पीक विमा भरण्याची मुदत येत्या ३१ जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेची अंतिम मुदत कालपर्यंत म्हणजे १५ जुलैपर्यंत होती. मात्र, महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांनी अजूनही पीक विमा भरलेला नाही; त्यामुळे पीक विमा भरण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केली होती. त्यांच्या मागणीनंतर ही मुदत ३१ जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर हे आजपासून दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत. भारत आणि मॉरिशस या देशांच्या परस्पर संबधांत वाढ व्हावी यासाठी हा दौरा असल्याचं डॉ. जयशंकर यांनी त्यांच्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. या दौऱ्यात डॉ. जयशंकर मॉरिशसचे प्रधानमंत्री प्रविंद जुगनाथ यांची भेट घेणार असून मॉरिशसच्या इतर वरिष्ठ नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठकही घेणार आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना रिपब्लिकन पक्षानं अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केलं आहे. मिलवॉकी इथं झालेल्या रिपब्लिकन राष्ट्रीय समिती सदस्यांच्या बैठकीत ट्रम्प यांना बहुमत मिळाल्यानंतर त्यांची अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यामुळे ट्रम्प सलग तिसऱ्या वेळा रिपब्लिकन पक्षाचे अधिकृत उमेदवार असणार आहेत. नोव्हेंबर महिन्यात ही निवडणूक होणार आहे. ओहायोचे सेनेटर जे. डी. व्हान्स आपले उपाध्यक्षपदासाठीचे उमेदवार असतील, असं ट्रम्प यांनी जाहीर केलं आहे. व्हान्स यांची निवड करून ट्रम्प यांनी पेनसिल्व्हानिया, मिशिगन आणि

व्हिस्कॉन्सिनसारख्या राज्यांवर आपला भर असल्याचं सूचित केलं आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी गोपनीय कागदपत्रांचा गैरवापर केल्याचा आरोप करणारं प्रकरण अमेरिकेतल्या एका जिल्हा न्यायालयानं फेटाळून लावलं आहे. या प्रकरणी जॅक स्मिथ यांची विशेष वकील म्हणून नेमणूक घटनाबाह्य असल्याचा निर्वाळाही न्यायाधीश एलीन कॅनन यांनी दिला आहे.

**<><><><><>**

स्विडीश ओपन टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत आज भारताच्या सुमित नागल याचा सामना स्विडनच्या एलियस यमेर याच्याशी होणार आहे. तर पुरुष दुहेरीत सुमित नागल आणि त्याचा जोडीदार कॅरोल ड्रझविकी यांची लढत फ्रान्सच्या अलेक्झांडर म्युलर आणि लुका वॅन या जोडीशी आज संध्याकाळी होईल. सुमित नागलने या हंगामात हेलब्रॉन चॅलेंजर आणि चेन्नई चॅलेंजर अशा दोन स्पर्धा जिंकल्या आहेत.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेंसेक्स या निर्देशांकात आज सकाळच्या सत्रात विक्रमी वाढ झाली. सुरवातीला २३० अंकांची वाढ नोंदवत ८० हजार ९०० अंकांवर पोचला आणि तिसऱ्या सत्रात निर्देशांक ८० हजार ७३२ वर आला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही सकाळच्या सत्रात वाढ बघायला मिळाली. निफ्टीतही सुरवातीला ७४ अंकांची वाढ झाली आणि तो २४ हजार ६१६ वर पोचला.

**<><><><><>**

आषाढी एकादशी उद्या साजरी होत आहे. यानिमित्त पंढरपूर इथं येणाऱ्या वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा आणि व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली “समन्वय समिती”

गठीत करण्यात आली आहे. ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री गिरीश महाजन तसंच सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री तानाजी सावंत या समितीत सदस्य म्हणून काम पाहणार
आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पंढरपूर दौऱ्यावर असून, त्यांच्या हस्ते आज उत्तररात्री अडीच वाजेच्या सुमारास श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली जाणार आहे.

<><><><><><>

मुंबईच्या उपनगरीय रेल्वे स्थानकांवरचे सरकते जिने आणि उद्वाहनांच्या देखभालीसाठी पश्चिम रेल्वेनं संकेतस्थळ आधारीत केंद्रीकृत देखरेख प्रणाली विकसित केली आहे. पश्चिम रेल्वेच्या काल प्रसिद्ध झालेल्या पत्रकात ही माहिती दिली आहे. त्याच बरोबर एक मोबाईल ॲप्लिकेशनही विकसीत करण्यात आलं आहे. हे ॲप्लिकेशन जिने किंवा उद्वाहन बंद असताना संबंधित यंत्रणांना तात्काळ माहिती पुरवतील त्यामुळे त्वरीत त्यांची देखभाल करणं सोपं जाईल, असंही या पत्रकात नमूद करण्यात आलं आहे.

<><><><><><>

नीट पेपर फुटी प्रकरणी सीबीआयनं काल रात्री झारखंडमधे हजारीबाग इथल्या एका गेस्ट हाऊसमधून एकाला अटक केली आहे. त्याच बरोबर हजारीबाग इथून अटक झालेल्यांची संख्या ५ झाली आहे.

<><><><><><>

मुंबई-पुणे महामार्गावर काल रात्री एका बस अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला असून ५ जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत. आषाढी एकादशीनिमित्त

डोंबिवलीहून पंढरपूरला जाणारी बस ट्रॅक्टरला धडकून दरीत कोसळली. या अपघातात ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू झाला. जखमींना नजीकच्या एमजीएम आणि शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांनी दिली.

**<><><><><><>**

मध्य महाराष्ट्र, कोकण आणि गोव्यासह दक्षिण कर्नाटक, गुजरातच्या सौराष्ट्र आणि कच्छ भागात आज जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**//<><><><><><>//**